**प्रस्तावना:-**

**विषय:-. प्रभाग समिती क्र ०५ च्या अंतर्गत असलेल्या महानगरपालीका जुन्या प्रशासकीय इमारतीची दुरुस्ती करणे.**

**प्रभाग समिती क्र ०५ च्या अंतर्गत असलेल्या महानगरपालीका जुन्या प्रशासकीय इमारतीची दुरुस्ती करणे रक्कम रु. २,०९,५६,७३५/-** -मात्रच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो यांची मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. **२,०९,५६,७३५/-**फेर ई-निविदा सुचना क्र. ८१/१०८८७२६ (२०२४-२५) दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.२०/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी निविदाकारांची नावे निविदेतील दर एकुण **१ निविदाकार** खालील प्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाकार | दर |
|---|---|---|
| १ | **मे महेंद्र रियलटर्स ॲण्ड इन्स्फ्रा. लि.** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा -८.००० टक्के कमी दराने** |

वरील पैकी **मे महेंद्र रियलटर्स ॲण्ड इन्स्फ्रा. लि** यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा **-८.०००** टक्के कमी दराने म्हणजेच रक्कम रु. **१,९२,८०,१९६** /- (अक्षरी एक कोटी ब्याण्णव लाख ऐंशी हजार एकशे शहाण्णव मात्र )च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.: - ६५० दिनांक :- १० /१०/२०२४

**मे महेंद्र रियलटर्स ॲण्ड इन्स्फ्रा. लि** यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा **-८.०००** टक्के कमी दराने म्हणजेच रक्कम रु. **१,९२,८०,१९६** /- (अक्षरी एक कोटी ब्याण्णव लाख ऐंशी हजार एकशे शहाण्णव मात्र ) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी **अजय वैद्य**, प्रशासक तथा आयुक्त **प्रभाग समिती क्र ०५ च्या अंतर्गत असलेल्या महानगरपालीका जुन्या प्रशासकीय इमारतीची दुरुस्ती करणे** कामी अंदाजपत्रकीय दरापेक्षा-**८.०००** टक्के कमी दराचे निविदाकार **मे महेंद्र रियलटर्स ॲण्ड इन्स्फ्रा. लि.** यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

(1)

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय:- भिवंडी निजामपुर महानगरपालिका हद्दितील प्रभाग समिती क्र.2 च्या कार्यक्षेत्रातील टेमघर गांव कल्याणरोड,साईबाबा मंदिर परिसरा भिवंडी पाईपलाईन परिसरात बँचेस बसविणे.**

मा. श्री.बाळाराम मधुकर चौधरी,जेष्ठ नगरसेवक,शिवसेना भिवंडी यांनी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका करिता महाराष्ट्र सुर्वण जंयती नगरोत्थान महाभियान जिल्हास्तर योजने अंतर्गत निधी बाबत मागणी केली आहे. त्याअनुषंगाने विषयांकित काम महाराष्ट्र सुर्वण जंयती नगरोत्थान महाभियान जिल्हास्तर योजने अंतर्गत प्रस्तावित करणे बाबत महाराष्ट्र शासन जिल्हानियोजन समिती ठाणे,यांचे कडील संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये कळविणेत आलेआहे. सदरचे काम संदर्भिय पत्रा मधील विवरण पत्रात क्र.१३ वर असुन सदर कामाचे अंदाजपत्रक सादर करणेअपेक्षितआहे. सदर योजने अंतर्गत जिल्हानियोजन समितीचा ७० टक्के हिस्सा व महानरगपालिकेच्या ३० टक्के हिस्सा राहणारआहे. विषयांकित ठिकाणी पहाणी केली असुन मधिल प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील स.नं.१३४१ येथील आरक्षण क्र.२०१ व २०२ या आरक्षित जागेवर खेळाचे मैदान व उद्यान विकसित करणे आवश्यकआहे.

विषयांकित कामी रक्कम रु.४९,९६,६८०/- (रु.एकोणपन्नास लाख शहाण्णव हजार सहाशे एंशी मात्र) खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त सो यांनी दि.26/07/2024 रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकिय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र. ६५१ दिनांक :१०/१०/2024

भिवंडी निजामपुर महानगरपालिका हद्दितील प्रभाग समिती क्र.2 च्या कार्यक्षेत्रातील टेमघर गांव कल्याणरोड,साईबाबा मंदिर परिसरा भिवंडी पाईपलाईन परिसरात बँचेस बसविणे. कामी रक्कम रु.४९,९६,६८०/- (रु.एकोणपन्नास लाख शहाण्णव हजार सहाशे एंशी मात्र) खर्चाच्या प्रस्ताव मंजुरीस सादर केला आहे.त्यास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी रक्कम रु.४९,९६,६८०/- (रु.एकोणपन्नास लाख शहाण्णव हजार सहाशे एंशी मात्र) खर्चाचा प्रस्तावास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.श.महानगरपालिका**

(2)

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय:- भिवंडी निजामपुर महानगरपालिका हद्दितील प्रभाग समिती क्र.2 च्या कार्यक्षेत्रातील टेमघर गांव कल्याणरोड,साईबाबा मंदिर परिसरा भिवंडी पाईपलाईन परिसरात बँचेस बसविणे.**

भिवंडी निजामपुर महानगरपालिका हद्दितील प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर गांव कल्याणरोड,साईबाबा मंदिर परिसरा भिवंडी पाईपलाईन परिसरात बँचेस बसविणे कामी रक्कम रु.४९,९६,६६७/- मात्र प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक २६/०७/२०२४ रोजी मंजुरी प्राप्त झाली आहे. मा.जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे,यांचेकडील जा.क्र./जिविया/का-४/नगरोत्थान/२०२४-२५/४७२० दि.२५/०९/२४ नुसार प्रशासकिय व आर्थिक मंजुरी दिल्यानुसार सदर कामाची रक्कम रु.४९,९६,६८०/- ई-निविदा सुचना क्र.९५/२०२४-२५(१०९७३८१) दि.०७/०८/२०२४ रोजी दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.०७/०८/२०२४ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा प्राप्त झाल्या असुन त्यापैकी पात्र झालेल्या निविदा खालीलप्रमाणे आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | **मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस** | **अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.५०% कमी दराने** |
| २ | मे.बुबेरे ॲण्ड असोशिएट्स | अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.०५० % जादा दराने |

वरील पैकी **मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस** यांची अंदाजपत्रकिय दररपेक्षा ०.५०% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.४९,७१,६९७/- (रु. एकोणपन्नास लाख एकाहत्तर हजार सहाशे सत्याणव मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- ६५२ दिनांक :-१०/१०/२०२४

मे.क्षत्रिय इन्फ्रास्ट्रक्चरल प्रा.लि यांची अंदाजपत्रकिय दररपेक्षा ०.५०% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.४९,७१,६९७/- (रु.एकोणपन्नास लाख एकाहत्तर हजार सहाशे सत्याण्णव मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर भिवंडी निजामपुर महानगरपालिका हद्दितील प्रभाग समिती क्र.2 च्या कार्यक्षेत्रातील टेमघर गांव कल्याणरोड,साईबाबा मंदिर परिसरा भिवंडी पाईपलाईन परिसरात बँचेस बसविणे.कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.क्षत्रिय इन्फ्रास्ट्रक्चरल प्रा.लि. यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.श.महानगरपालिका**